म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. २६३

# पोवाडा. १९

मुंबई )

( चाल–धन्य शिवाजी० )

बलवंताच्या कृपा–प्रसादें रचिला पोवाडा ॥
पोवाडा दिसण्यांत वांकडा, गात 'राम' वेडा ॥
कोठें श्री बलवंत ? कुठें मी पामर मति–मंद ॥
अतर्क्य गुणवर्णनास कुंठित गती पडे बंद ॥
अविकाराच्या विकार–रूपा कसें वर्णवेल ? ॥
प्रयत्न करणें मनुजा हातीं असें बोल खोल ॥
दिव्य प्रभेची मूर्त सत्यता कशी पटविणार ? ॥
स्वानुभवानें कळतें असलें तत्व सांगणार ॥
मनांत आले विचार साधे स्पष्टपणें दिसलें ॥
अंध–भक्तिनें कीं, प्रेमानें तें तें बोलविलें ॥
बलवंताचें लेणें ल्याला हिंद आर्य–वीर ॥
हृत्पटलीं जीवांच्या नांदे अक्षय नरवीर ॥
बलवंताची स्मरणी स्मारक म्हणुनी पोवाडा ॥
सुमनांजलि बलवंतपदातें यास्तव हा जोडा ॥
तिलांजलीचा पोवाडा जो मानावा गोडा ॥

अबालवृद्धां विनतीं एकच या न कदा सोडा ॥
कुठें सूर्य नव ? कुठें काजवा ? हिरा कुठें हीर ॥
मूढ प्रयत्ना ' अपुला ' म्हणतां होती उपकार ॥
बलवंताची सेवा करणें अल्पस्वल्प कांहीं ॥
विचार आले काव्या कळलें अन्य हेत नाहीं ॥
बलवंताचे गुण ठसवावे व्हावें बळवंत ॥
नामधारि बळवंत नसावें यथार्थ बलवंत ॥
कित्ता बळवंताचा गिरवा व्हालचि यशवंत ॥
श्रीमंतहि धीमंत भूतलीं किंवा गुणवंत ॥
बलवंतानें जें जें केलें तें तें आचरितां ॥
समाधान संतोष सुखाचा क्षण लाभे हातां ॥
राष्ट्रवीर बाळाचा गाणें पोवाडा आज ॥
जाहीरपणें शाहीराला गाण्या कां लाज ? ॥
लाज कशाला ? भीड कुणाची ? भय कसलें कोणा ? ॥
अंतरिच्या प्रेमाची उसळी उसळतेच जाणा ॥

* * * *

' गंगाधरसुत ' गंगाधरसुत बाळ बाल-राजा ॥
वेचीं तन-मन-धन सर्वस्वही सदा राष्ट्र काजा ॥

ज्ञानरवी उन्नती–पथाचा जागरूक मूर्त ॥
असामान्य सद्गुणें विलसला लोकमान्य धूर्त ॥
अढळ निश्चयी कर्म–वीर हा राष्ट्रभक्त कट्टा ॥
जीव जिव्हाळा धैर्यमेरु तो नरकेसरि पठ्ठा ॥
महाराष्ट्र–पुण्याईचें फळ ‘बाळ’ जन्म झाला ॥
नव तेजाच्या दिव्यपणानें दावी नवलाला ॥
कुलदीपक राष्ट्ररत्न शोभे भू–नर–शार्दूल ॥
कर्मक्षेत्रीं एक यशस्वी वीर गडी अतुल ॥
स्वकिय–परांचा प्राण विसावा पतितांचा थारा ॥
जनतेचा कैवारी असला आवडला थोरां ॥
हिंदभूमिच्या स्वातंत्र्यास्तव केवळ झटपटला ॥
“स्वराज्य” मागा या टाहोनें बहुजन खडबडला ॥
सन अठराशें छप्पन सालीं तेविस जुलईस ॥
हिंद देविचा प्यारा बालक आला जन्मास ॥
मातृ–पितृ–ऋण पांग फेडण्या पूर्वज पुण्याई ॥
पुण्यानें अवतरली वाटे धन्य धन्य आई ॥
चिपळुणकर, गोखले, आगरकर यांचा मुकुटमणी ॥
नवरोजी–लाला–पालांचा जिवलग भवतरणीं ॥

'फर्ग्यूसन कॉलेज' स्थापना 'न्यूइंग्लिशस्कूल' ॥
मूर्तिमंत दावित बाळाची शिक्षण-तळमळ ॥
लोकाश्रय मित्रांच्या साह्यें प्रस्थापित संस्था ॥
उभारणी भक्कम पायाची वृद्धिंगत संस्था ॥
न्यायमूर्ति रानडे गुरूंचा चेला प्रिय 'बाळ' ॥
खापर्ड्यांचा जिगर जिव्हाळा दोस्त 'तिलकबाळ' ॥
'कृष्णाजी,' 'नरसिंहा' होई बाटाच्या बाळ ॥
स्वराज्य संघाचा हा नेता मंगल वेल्हाळ ॥
ज्योतिर्भूषण पंचांगाचा नवशोधक बाळ ॥
नाना भाषाभिज्ञ कलांचा आवडता बाळ ॥
संपादक केसरी-मराठा थोर वृत्तपत्रें ॥
यंत्रित करि टीकेच्या द्वारें आंग्लराज्य सूत्रें ॥
अनभिषिक्त राजपुत्र राजस कर्म-वीर बाळ ॥
महाराष्ट्राचा अलंकार नव एक एक बाळ ॥
गणिती भासे, कुशाग्र विलसे, इंजिनियर बाळ ॥
यांत्रिक-मांत्रिक-तांत्रिक सारे जाणतसे बाळ ॥
कृत्रिम कारागृहवासाची त्रिवार वेळ पडे ॥
उलट दिशेनें जीवकसोटी उज्वल येत पुढें ॥

अठराशें नव्वद–सत्याण्णव साल बंदिवास ॥
एकोणिसशें अठव्या वर्षी स्थलांतरें त्रास ॥
ब्रह्मदेश–मंडाले शहरीं राज–कैद खास ॥
सात वर्ष भोगाया जावें लगे टिळकास ॥
सत्तेपुढतीं शहाणपण कां टिके कुठें सांगा ? ॥
राजाज्ञा उल्लंघन करणें उचित दिसे कां गा ? ॥
नीति–कायदा धर्म–बंधनें उच्चनीच काय ? ॥
विचार असला तुच्छ मानिता इष्ट कार्य होय ॥
सन्मानाची घेणें पदवी भिकारडी हाव ॥
संपत्तीचे आमिष ज्यांचें ना मळवी नांव ॥
ब्राह्मण असतो कृतींत, नसतो जन्म कुळीं घेतां ॥
उदार–चरितें तत्व पटविता बाळ तिलक होता ॥
गजाननाचा जाहीरपणें धार्मिक उत्साव ॥
पुराण कीर्तन मेळा द्वारें ठसवि उच्चभाव ॥
एकीचें संवर्धन करणें जाणा संथपणें ॥
फूट नसावी जूट असावी तरि सार्थक होणें ॥
हिंदु मुसलमानांची एकी राम रहिम एक ॥
हिंदूपण एकच आर्यांचे भेद जरी कैक ॥

ओरायन शास्त्रिय ग्रंथाचा जनक बाळ होता ॥
गीतार्थ रहस्याचा शोधक योजक कल्पलता ॥
ओड्वायर प्रभृतीस होता पुरा पुरा वैचक ॥
नोकरशाहीच्या जुलुमाला फटकारा अचुक ॥
राजनीतिचें धोरण चुकता दुरुस्त करण्याचा ॥
प्रयत्न केला अलोट धैर्ये खास चिकाटीचा ॥
जहाल किंवा मवाळ यांचा समेट युक्तीनें ॥
राष्ट्रद्रुही मोडण्या झगडला बाळ कुशलतेनें ॥
सहकारी तत्त्वांच्या मागें सत्तेला जोड ॥
देण्यातें माघार–ढिलाई न दाखवी खोड ॥
होमरूलचें तत्व पटविण्या द्वीपांतरीं गेला ॥
बादशाही आश्वासन मिळवी स्वराज्य देण्याला ॥
नालायक हिंदू कां दिसती ? सांगा काय उणें ?
पारतंत्र्य रौरवांत जातें असोल फुकट जिणें ॥
अमुचे आम्हां परत द्यावया शंका कां येते ? ॥
स्वराज्य साम्राज्यांतर्गत या पात्र हिंद जन ते ॥
पंजाबाच्या अत्याचाराहून किळसवाणें ॥
अधिक घोर भीषण कां ? वसते मानव ना नेणें ॥

निरापराधी कत्तल केले नोकर–शाहीनें ॥
अद्भुत प्रेमाचें दिग्दर्शन पापी कृत्यानें ॥
जालियनवाला नांव ऐकतां हृदयाला चरका ॥
आंग्ल–दयेचें कठोर स्मारक झालेलें ऐका ॥
स्वतंत्र पैसा–फंड कल्पना, कांच–कारखाना ॥
पिकेटिंग, गोरक्षण चळवळ कार्य साक्ष माना ॥
दुष्काळीं प्लेगाचीं कार्यें दृश्यरूप सकलां ॥
कर्तव्याचा अहोरात्र अभ्यास असे बाळा ॥
डेप्युटेशनें कॉंग्रेस दिसे बैठक बाळाची ॥
देश–भक्तिची अपूर्व तळमळ उमगा हृदयाची ॥
झाले, असती, होतिल पुढती, परी असा बाळ ॥
न कदा कोठें अशक्य होणें यास्तव तळमळ ॥
निर्मित वस्तू नाश होतसे तत्व सहज मान्य ॥
काल–मुखीं हो अकालिं पडला बळी लोकमान्य ॥
दैवी इच्छा मानव यत्ना पराभूत करते ॥
हिरा 'बाळ' भंगला, अनुभवा पूर्णत्वें येतें ॥
एकोणिसशें वीस वत्सरीं ऑगस्ट पहिलीस ॥
संन्यासी कर्म–क्षेत्रावर घेत समाधीस ॥

गेला नरमणि दिनमणि गेला अस्तंगत झाला ॥
जीव जिव्हाळा देवाजीला बाळ पहा रुचला ॥
दिवाभीत कीं निशाचरांचें प्रस्थ न माजावें ॥
खडा पहारा जिवंत करिती सदा टिळक तत्वें ॥
निर्घृण काळा ! ओढुनि नेला राष्ट्र प्राण गोळा ॥
सौभाग्याचा तिलक पुसटता लाज न कां तुजला ? ॥
जीवन स्वारस्याचें लोपे हाहाकार दिसे ॥
प्रेमाब्धी आटे तरि फाटे जीवन कोठ कसें ? ॥
पारतंत्र्य सोन्याचा खोडा नको अडकवाया ॥
स्वातंत्र्याची मीठ भाकरी बरी सुखे खाया ॥
विचार-उच्चारीं आचारीं स्वतंत्रता खेळे ॥
निस्पृह बाळाच्या पायावरि स्वतंत्रता लोळे ॥
तेल बुद्धिला उत्तम शिक्षण शिकवण थोराची ॥
बीज तशी येतील फळें त्या वाणी संताची ॥

* * * *

टिळकपणाचा विशेष म्हणजे स्वाभिमान होता ॥
स्पष्टपणाचा बाणा साधा झगझगीत पुरता ॥
राष्ट्र-प्रेमी स्वातंत्र्याचा टिळकपणा दिसला ॥

स्वदेशभक्ती टिळकपणा कीं दिव्य तेज गोळा ॥
सत्यव्रत वा धर्म पताका टिळकपणा म्हणती ॥
तनमन शीलाच्या शुद्धीला टिळकपणा वदती ॥
विचारसरणी उच्च राहणी साधी हें तत्व ॥
टिळकपणाच्या ठळकपणाचें गूढ मुख्य तत्व ॥
संकटकालीं न कदा डगमग लगवग धैर्याची ॥
टिळकपणानें शांतपणानें सांगड कार्याची ॥
शक्ती–भक्ती–युक्ती यांच्या योग्य योजनेला ॥
कर्तव्याला डर ना बोला टिळकपणा याला ॥
निर्वाणीचा प्रसंग येता चिकाटिचें ध्येय ॥
कर्म–रहस्या मधील मिळवी टिळकपणा श्रेय ॥
विश्वासाची ध्वजा फडाडे टिळकपणावरती ॥
कार्य–धडाडी उल्हासाची नुरते भय भीती ॥
टिळकपणा जागरूक विश्वा जागा जागविता ॥
ऋद्धि–सिद्धि वश हां हां ह्मणता टिळकपणा असतां ॥
कुटुंब माझें ‘ विश्वजागते ’ म्हणणें टिळकपणा ॥
तिलांजली स्वार्थावरि देणें बाणें टिळकपणा ॥
ब्रह्मपदाची रहस्य–किल्ली वाटे टिळकपणा ॥

मूर्तिमंत चैतन्य दिव्यता भूतल टिळकपणा ॥
नव जोमाच्या उत्साहानें झटणें टिळकपणा ॥
परोपकारी झीज तनूची जाणे टिळकपणा ॥
सर्वांभूतीं परमेश्वर हा चोखा टिळकपणा ॥
सच्छीलानें देह–सफलता करणें टिळकपणा ॥
बोले तैसा चाले ऐशी वृत्ती टिळकपणा ॥
समाधान–संतोष राखणें तेव्हां टिळकपणा ॥
जन सेवेची हौस सदोदित ठेवी टिळकपणा ॥
बुडल्या भीता जिवंत करणें घडतां टिळकपणा ॥
परामर्ष हीनांचा घेणें अखंड टिळकपणा ॥
दुबळ्यांचा कैवारी होणें जेव्हां टिळकपणा ॥
कळतो सकला कळविण्यास जो दुर्गम टिळकपणा ॥
पटतें परि पटविण्यास दुर्लभ जें तें टिळकपणा ॥
स्वयंसिद्ध लोकमान्य प्रियदा जिवंत टिळकपणा ॥
टिळकपणा म्हणजेच टिळकपण ठेवा आठवण ॥
ईशतत्व सत्यता शुद्धता म्हणजे टिळकपण ॥
टिळकपणा अनुपमेय भासे टिळकपणा नित्य ॥
टिळकपणा सात्विक प्रेमाची भावनाच सत्य ॥
टिळकपणा मांगल्य शोभते टिळकपणा ज्ञान ॥

राज-काज-नैपुण्य टिळकपण वारी अज्ञान ॥
वैराग्याचा धवल-चंद्रमा टिळकपणा होय ॥
टिळकपणा परमात्मपदाचो सहज सुलभ सोय ॥
तेंच टिळकपण भेद भावना क्षणार्धांत विरती ॥
सामाजिक राष्ट्रीय प्रेरणा टिळकपणीं वसती ॥
टिळकपणा पूर्णांश विलसतो सद्गुण हा अंश ॥
एक एकला पूर्णांशाचा अंशही पूर्णांश ॥
टिळकपणा म्हणजेच टिळकपण अन्य न टिळकपणा ॥
टिळकत्वें टिळकपणा येतो टिळकपणा बाणा ॥
संकट-स्वागत आनंदानें करणें टिळकपणा ॥
परिस्थिती वादळांत होतो उन्नत टिळकपणा ॥

*    *    *    *

उन्नत राष्ट्रा! भारत वर्षा! आर्य मायदेशा! ॥
सुसंस्कृतीच्या प्रज्वलरूपा दिव्य-पुण्य-देशा ॥
नयन मनोहर शोभिवंत नव रत्नखचित देशा ॥
आर्यत्वाच्या पुण्याईच्या कांचनमय देशा ॥
सद्गुणमंडित, कर्मठ, सोशिक, सोज्वल, प्रेमळसा ॥
अढळ शांतता समता वसते तव पोटीं परिसा ॥

वीर गड्यांचा स्वातंत्र्याचा मर्द मराठ्यांचा ॥
रजपूतांचा हिंद देश हा हिंमत खुर्दांचा ॥
रणगाजीचा विद्वानांचा भाविक भक्तांचा ॥
जिवा–शिवांचा कीं संतांचा कोळ्या–माळ्यांचा ॥
स्वयंप्रकाशित आत्मरसाच्या उच्च भावनांचा ॥
उदार सात्विक मनोवृत्तिच्या रसज्ञरसिकांच्या ॥
विविध धर्म पंथांचा आश्रय वा हिंदुस्थाना ॥
मायेच्या सोयऱ्या जिवलगा पतितांच्या प्राणा ॥
निसर्ग देवीचें कीं अंगण महाभाग्यवंता ॥
सरस्वती–माहेरा राष्ट्रा गुरू एक जगता ॥
विचित्र–लीला–कला–कुशलता केंद्र महाराष्ट्र ॥
अधिष्टान परकीया वाटे हाच महाराष्ट्र ॥
दादोजी रामदास तुकया चोख्या महाराचा ॥
दामाजी कबिराचा तैसा नाम्या शिंप्याचा ॥
तारामति–मुक्ताबाईचा जनी–जिजाईचा ॥
दमयंती–द्रौपदी–अहिल्या–सीतामाईचा ॥
भर्तृहरी–रामजोशीतात्या–मोरोपंताचा ॥
ज्ञानेश्वर, एकनाथ किंवा वामन पंडितचा ॥

ध्रुव–चिलया–प्रल्हादाचा प्रिय कीं सूर्याजीचा ॥
रामकृष्ण हनुमद्वीरांचा शिव–तानाजीचा ॥
बाजीचा वा महादजीचा नरशार्दूलांचा ॥
धारातीर्थीं पतन पावले त्या त्या वीरांचा ॥
स्वराज्य प्राणा साठीं झिजले त्या त्या वीरांचा ॥
मोंगलशाही–लोकशाहिचा नोकरशाहीचा ॥
नव्या–जुन्यांच्या मता–मतांचा आल्या–गेल्यांचा ॥
बाबर–अकबर–बादशहाचा अवरंगजेबाचा ॥
तुघलख–घोरी–सय्यद–गिझनी पूर्व घराण्यांचा ॥
वीरांची माता कांता वा दुहिता आर्येचा ॥
पातिव्रत्यें सुराष्ट्र केलें त्या त्या अबलेचा ॥
राष्ट्रासाठीं पावित्र्यानें झगडत गंभीर ॥
त्या आर्यांचा महाराष्ट्र नव शोभे खंबीर ॥
चिपळुणकर गोखले रानडे वा नवरोजीचा ॥
बिझांट, हार्निमन, लालाजी, बाल, पाल यांचा ॥
करड्या मोंगलसुलतानीचा प्रशांत–कालांचा ॥
स्थितप्रज्ञ महाराष्ट्र नांदतो साक्षी कालांचा ॥
पैगंबर–नानक–बुद्धाचा हो आचार्यांचा ॥

महाराष्ट्र अठराजातींचा परधर्मीयाचा ॥

*          *          *          *

पुरे पुरे शोक हा भारता ! उठ धरी धीर ॥
अपार वस्तू निर्मित गेल्या किती तरी थोर ॥
गेल्याचा शोक कां करावा ? उचित नसे वीरा ॥
गेल्याच्या सद्‌गुण तत्वांना आचरि गंभीरा ॥
आला आला जन्मा आला मेला तो गेला ॥
जगणारे मरणारे सारे जीव शून्य दिसला ॥
स्थिरचर द्रव्यें नाश पावती तत्वाला मिळती ॥
शून्यत्वानें शून्य भासता मेलेल्या म्हणती ॥
गेली वेळा गेली संधी पुन्हां कधीं नसते ॥
एक एकदा होतें घडतें नवल स्मृती असते ॥
नवरूपानें नव कालाला नवें नवें दिसतें ॥
जें गेलेलें तेंच नव्यानें उदयाला येतें ॥
पूर्णांशाचे अंश जीव हे बनती पूर्णांश ॥
अंश अंश एकांत मिसळता दिसेल पूर्णांश ॥
नश्वर काया अमर कराया सत्कृति हा पंथ ॥
कीर्ती–रूपें अमरपणा ये नवल नसे यांत ॥

नव्या दिलाच्या ऐकोप्यानें कार्यसिद्धि करणें ॥
कर्म-मार्ग-व्रत श्रद्धापूर्वक राष्ट्रा ! आचरणें ॥
व्यास-वाल्मिकी-याज्ञवल्क्य-मनु-पाराशर मुनिच्या ॥
श्रुति-स्मृतीच्या वेद-महर्षि-पुराण तत्वांच्या ॥
आर्यावर्ता ! ऊठ ऊठरे विलंब अल्प नको ॥
अंगीकृत कार्यास यशस्वी करण्या भीड नको ॥
स्वदेशप्रीती स्वजनीं प्रेमा जन-सेवा हौस ॥
हींदीराष्ट्रा ! नित्य बाळगीं सत्य व्रत-ध्यास ॥
झाड तोडिता नव उसळीनें फोफावे पाही ॥
ओढवती राष्ट्रीय आपदा सदा सर्वदाही ॥
सामर्थ्याची चळवळ करणें राष्ट्रकर्म जाणें ॥
भगवंताचें अधिष्ठान मग देशांतरिं बाणें ॥
स्वदेश माझा स्वधर्म माझा जन माझा माझा ॥
स्वाभिमान पूर्वक म्हणताना करी राष्ट्रकाजा ॥
परमार्थाची ज्योत पाजळी ज्ञान तैल घाली ॥
आत्म पाहणें स्वार्थत्यागें यशवंता वेळीं ॥
परवशता दैन्य कीं आपदा विलयातें जाती ॥
स्वातंत्र्याचें तेज झळाळे सुखें घरा येती ॥

म. ग्रं.
विषय
सं. नं.

मायेचा हा क्षणिक पसारा महाभाग्यवंता
अमर सुखांचा झरा झरारा वाहे धीमंता ।
शोक आवरी ! ऊठ लौकरी कर्तव्या जाग
स्वयंस्फूर्तिच्या अवसानानें कार्याला लाग
किती नवोनव फुलें विकसलीं पहा जागजागीं ॥
अपूर्वतेनें सदा विलसलीं तुझ्या पृष्ठभागीं ॥
संकट किंवा आणीबाणी प्रसंग कोसळता ॥
दुर्दैवाचा झोला तुटता हाय नको चित्ता ॥
गेल्याचा सद्गुण ठसवावा स्मृति पटला वरतीं ॥
आचरणीं आचरता त्यांचें स्मारक या जगतीं ॥
शोक आवरी उत्साहानें व्यवहारीं पडणें ॥
धैर्य–चिकाटी–उल्हासानें कार्यक्षम होणें ॥
आळस सोडी धैर्ये जोडी स्वावलंबनाला ॥
अपारशक्ती अचाट–साहस लागे एकीला ॥

मुद्रक—सीताराम विष्णु लळीत,
'लोकसेवक' प्रेस, गोवर्धन हाऊस, पारेख स्ट्रीट,
गिरगांव–मुंबई नं ४.
प्रकाशक–गणेश महादेव आणि कंपनी,
४ माधवाश्रम, गिरगांव–मुंबई.

१२०८०